कोल्हापूर टाइम्स टीम

# गरजूंपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवा

## श्रीमंत शाहू छत्रपती यांचे आवाहन; टाइम्स ग्रुपच्या वतीने २१ डॉक्टरांचा सन्मान

'समाजातील सर्व गरजू घटकांना दर्जेदार आणि सुलभ वैद्यकीय सेवा मिळावी हा त्यांचा अधिकार आहे. यासाठी ज्येष्ठ डॉक्टरांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल,' असे मत श्रीमंत शाहू छत्रपती यांनी व्यक्त केले. टाइम्स ग्रुपने आयोजित केलेल्या आयकॉन्स ऑफ हेल्थ कार्यक्रमात ते बोलत होते.

हॉटेल सयाजी येथे बुधवारी सायंकाळी हा दिमाखदार सोहळा पार पडला. टाइम्स ग्रुपने केलेल्या विशेष गौरवामुळे काम करण्याचा उत्साह आणखी वाढल्याच्या भावना डॉक्टरांनी व्यक्त केल्या. प्रमुख पाहुणे श्रीमंत शाहू छत्रपती, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि हृदयविकार तज्ज्ञ डॉ. एम. डी. दीक्षित यांच्या हस्ते डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. राजर्षी शाहू महाराजांचा दातृत्वाचा वारसा जोपासणाऱ्या नगरीत वैद्यकीय सेवेचा सन्मान झाल्याने डॉक्टरांनी टाइम्स ग्रुपचे विशेष आभार मानले.

यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, 'डॉक्टर हा समाजातील महत्त्वाचा घटक आहे. डॉक्टरांमुळेच रुग्णांना जीवदान मिळते. सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय शिक्षण मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि माफक खर्चात असावी. यामुळे डॉक्टरांची संख्या वाढून गरजूंना वेळीच दर्जेदार सेवा मिळतील. ज्येष्ठ डॉक्टरांनी यासाठी विशेष योगदान द्यावे.

अमित गद्रे



आयकॉन्स ऑफ हेल्थ या उपक्रमात दक्षिण महाराष्ट्रातील २१ डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे श्रीमंत शाहू छत्रपती, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि बेळगाव येथील हृदयविकार तज्ज्ञ डॉ. एम. डी. दीक्षित यांच्यासमवेत सत्कारमूर्ती डॉक्टर.

बेळगाव येथील केएलई हॉस्पिटलचे निवृत्त हृदयविकार तज्ज्ञ डॉ. एम. डी. दीक्षित म्हणाले, 'टाइम्स ग्रुपकडून मिळालेला सन्मान डॉक्टरांसाठी जीवनगौरव पुरस्कारासारखा आहे. कोल्हापूरचा इतिहास प्रेरणादायी आहेच. आयकॉन्स ऑफ हेल्थ या उपक्रमाच्या निमित्ताने डॉक्टरांचा उत्साह आणखी वाढला. रुग्णांची काळजी घेणाऱ्या हातांचा सन्मान करण्याचे महत्त्वाचे काम टाइम्स ग्रुपने केल्याने हा केवळ काही डॉक्टरांचा सन्मान नाही, तर संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राचा सन्मान आहे.' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बदलती जीवनशैली आणि वैद्यकीय सेवेच्या गरजेकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, 'वाढत्या व्यावसायिकतेमुळे डॉक्टरांसाठी फार कमीवेळा कौतुकाचे क्षण मिळतात. टाइम्स ग्रुपच्या माध्यमातून डॉक्टरांच्या सेवेचे कौतुक होत आहे. हे काम मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल.'

या कार्यक्रमात कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील २१ डॉक्टरांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सन्मान सोहळ्यासाठी सत्कारमूर्ती डॉक्टरांचे कुटुंबीय, मित्र आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली. कुटुंबीयांसमवेत झालेला हा गौरव डॉक्टरांसाठी विशेष ठरला. कामातील व्यस्ततेमुळे अन्यवेळी सार्वजनिक ठिकाणी फारसे न आढळणारे प्रसिद्ध डॉक्टर्स यानिमित्ताने एकत्र आले. मोना देठे यांनी सूत्रसंचालन केले.

### आयकॉन्स ऑफ हेल्थ

डॉ. संतोष प्रभू, डॉ. सचिन एन. पाटील, डॉ. भास्कर प्राणी, डॉ. प्रतापराव गोळे, डॉ. विजयकुमार माने, डॉ. अमित असलकर, डॉ. मोहन धर्माधिकारी, डॉ. कल्याणी कुलकर्णी, डॉ. गिरीश दातार, डॉ. सूरज पवार, डॉ. रेश्मा पवार, डॉ. आशुतोष देशपांडे, डॉ. शांतीप्रसाद तिप्पन्नावर, डॉ. दत्तात्रय चोपडे-पाटील, डॉ. सौरभ पटवर्धन, डॉ. मयुरेश देशपांडे, डॉ. मोहन पाटील, डॉ. एस. एन. पाटील, डॉ. निकेत शहा, डॉ. मिहीर बिरनाळे, डॉ. मीरा कुलकर्णी

### बहरदार गझलांची मैफल

जीवनगाणे ग्रुपचे सचिन जगताप, केदार गुळवणी, भाग्यश्री मुळे, संजय साळोखे, प्रशांत देसाई, शिवाजी सुतार यांच्या संगीत कार्यक्रमाने आयकॉन्स ऑफ हेल्थची रंगत वाढवली. उपस्थितांनी बहारदार गझलांच्या सुरात सूर मिसळला.



टाइम्स ग्रुपने केलेला सन्मान माझ्यासाठी आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. डॉक्टरांवरील समाजाचा विश्वास आहेच. तो आणखी वृद्धिंगत होईल. रुग्ण व डॉक्टर यांच्यातील नाते घट्ट करणारा हा उपक्रम आहे.

– डॉ. विजयकुमार माने, मॉडर्न होमिओपॅथी रिसर्च अँड ट्रीटमेंट, कोल्हापूर



लहानपणापासून माझा टाइम्स ग्रुपसोबत प्रवास सुरू आहे. टाइम्स ग्रुपने केलेला सन्मान केवळ डॉक्टरांचा नाही, तर रुग्णांसोबत केलेल्या प्रवासाचा आहे. आयकॉन्स ऑफ हेल्थ उपक्रमामुळे डॉक्टरांचा उत्साह वाढला असून, यातून तरुण डॉक्टरांना प्रोत्साहन मिळेल.

– डॉ. संतोष प्रभू, विन्स हॉस्पिटल, कोल्हापूर



श्रीमंत शाहू छत्रपतींच्या उपस्थितीत तसेच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्रसिद्ध हृदयविकार तज्ज्ञ डॉ. एम. डी. दीक्षित यांच्या हस्ते मिळालेला सन्मान आमच्यासाठी दुग्धशर्करा योग आहे. टाइम्स ग्रुपच्या उपक्रमामुळे आमच्या प्रेरणास्थानांचा सहवास मिळाला.

– डॉ. सचिन पाटील, सचिन सुपर स्पेशालिटी क्लिनिक, कोल्हापूर



सेवाव्रती डॉक्टरांचा सन्मान करण्याची कल्पना खूप चांगली आहे. टाइम्स ग्रुपच्या या उपक्रमामुळे तीन जिल्ह्यांतील डॉक्टर्स एकाच व्यासपीठावर आले. प्रामाणिकपणे केलेल्या सेवेचा हा सन्मान असून, डॉक्टरांचा उत्साह वाढवणारा आहे.

– डॉ. गिरीश दातार, सुश्रुता हॉस्पिटल फॉर ऑर्थोपेडिक्स अँड ट्रामा, मिरज



अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत डॉक्टरांच्या सेवेचा सन्मान झाला. माझ्यासाठी हा क्षण अविस्मरणीय आहे. आयकॉन्स ऑफ हेल्थ या उपक्रमाच्या निमित्ताने दातृत्व आणि विद्वत्तेचा संगम अनुभवास आला. पुढील कामांसाठी आम्हाला ऊर्जा मिळाली.

– डॉ. आशुतोष देशपांडे, ओरल हेल्थ सेंटर, कोल्हापूर



मेडिकल कॉलेजमधील शेवटची परीक्षा देताना वाटले होते की, आता आयुष्यातील परीक्षा संपली. पण, प्रॅक्टिस करताना समजले की, प्रत्येक रुग्ण ही डॉक्टरांसाठी परीक्षाच असते. टाइम्स ग्रुपने केलेल्या सन्मानामुळे रुग्णांच्या परीक्षेत पास झाल्याचा आनंद मिळाला.

– डॉ. सौरभ पटवर्धन, नंदादीप आय हॉस्पिटल, सांगली आणि कोल्हापूर



रुग्णांच्या चेहऱ्यावरील हसू आणि डोळ्यातील आनंदाश्रू ही आमच्या कामाची पोचपावती असते. अलिकडे वाढत्या व्यावसायिकतेमुळे रुग्ण व डॉक्टर्स यांच्यातील नाते दुरावत आहे. या स्थितीत टाइम्सने केलेला डॉक्टरांचा गौरव उत्साहवर्धक आहे.

– डॉ. भास्कर प्राणी, ॲक्सिडेंट अँड आर्थोपेडिक हॉस्पिटल, मिरज



टाइम्स ग्रुपने केलेला सन्मान हा आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या रुग्णांचाही सन्मान आहे. या सन्मानामुळे काम करण्याचा उत्साह द्विगुणित झाला. यापुढेही आम्ही सेवेत सदैव तत्पर राहू. गरजू रुग्णांना माफक किमतीत उपचार देऊन सामाजिकतेचे भानही जपले जाईल.

– डॉ. प्रतापराव गोळे, मीनाक्षी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, सातारा

नवभारत

# बांगलादेशी अनुसंधानकर्ताओं को लाभ

संवाददाता

**कोल्हापुर.** जैविक शास्त्र के अनुसंधान में भारत के सभी विश्वविद्यालयों में अग्रणी शिवाजी विश्वविद्यालय के साथ हुए सामंजस्य करार का बांगलादेशी अनुसंधानकर्ता छात्रों को अच्छा लाभ होगा, ऐसा मंतव्य ढाका के जहांगीर नगर विश्वविद्यालय के जैव तकनीक एवं जनुकीय अभियांत्रिकी अधि विबाग के प्रमुख प्रा. डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल ने किया.

**डॉ. अब्दुल्ला शोहेल का मंतव्य**



ढाका (बांगलादेश) के जहांगीर नगर विश्वविद्यालय तथा शिवाजी विश्वविद्यालय में शैक्षणिक एवं अनुसंधान के तौर पर आदान-प्रदान करने की दृष्टि से सामंजस्य करार हुआ.

इस करार पर डॉ. शोहेल और शिवाजी विश्वविद्यालय के कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर ने हस्ताक्षर कर इस करार को अंतिम रूप दिया.

डॉ. शोहेल ने कहा कि, शिवाजी विश्वविद्यालय के जैव तकनीक और सूक्ष्म जीवशास्त्र अधिविभाग अनुसंधान में काफी आगे बढ़ चुके है. साथ ही जहांगीर नगर विश्वविद्यालय ने बांगलादेश में बायोसेफ्टी तथा सिक्युरिटी, मॉलेक्यूलर बायोटेक्नॉलॉजी में बड़ा काम किया है. दोनों ही संस्थाओं में हुए सामंजस्य करार से संयुक्त अनुसंधान प्रकल्प समेत फैकल्टी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम जैसे उपक्रम चलाए जा सकेंगे. यह उपक्रम जीवशास्त्र अनुसंधान में मील का पत्थर साबित होगा.

शिवाजी विश्वविद्यालयके प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के ने कहा कि, यह सामंजस्य करार केवल दो विश्वविद्यालयों में ही नहीं बल्कि दो देशों के हितों में काम करेगा. शिवाजी विश्वविद्यालय के हर विद्याशाका के विशेषज्ञ समिश्र शिष्टमंडल ढाका जाएं और वहां अवसरों खोजने का प्रयास करें.

Navabharat Pune Edition
15 Feb, 2019 Page No. 4

# सामंजस्य कराराचा संशोधक विद्यार्थ्यांना लाभ

## डॉ. अब्दुल्ला शोहेल यांचे मत

**कोल्हापूर :** जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी असलेल्या शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य कराराद्वारे सहकार्य वृद्धी ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्याचा बांगलादेशच्या संशोधक, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल, अशी भावना बांगलादेशमधील ढाका येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी व्यक्त केली.



■ ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात आज शैक्षणिक व संशोधकीय देवाणघेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात आज शैक्षणिक व संशोधकीय देवाणघेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर.के. कामत, डॉ. ए.व्ही. घुले, डॉ. ए.एम. गुरव, वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह संशोधक, शिक्षक उपस्थित होते.

लोकमत

# नेतृत्व विकास केंद्राच्या समन्वयकपदी शिवाजी जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** :शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राच्या समन्वयकपदी नियुक्त झाली आहे. ही नियुक्ती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केली.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याकडून डॉ. जाधव यांना यासंबंधीचे पत्र प्राप्त झाले. डॉ. जाधव यांनी पत्रकारितेत १५ वर्षे बातमीदारीपासून ते सहयोगी संपादक पदापर्यंतच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

त्यांनी आतापर्यंत १२ पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांबरोबरच समाजातील विविध घटकांतील नेतृत्व गुणांना चालना देण्याचा प्रयत्न या केंद्राच्या वतीने करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या केंद्राचे कामकाज चालणार आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 15, 2019
Powered by: erelego.com

# परीक्षा २३ मार्चपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना २३ मार्चपासून प्रारंभ होणार असून ५२ दिवस सुरू राहणाऱ्या परीक्षाकाळात ६४० हून अधिक विषयांच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी ही माहिती दिली. विद्यापीठात पदवी व पदव्युत्तरसह दूरशिक्षण विभागातील विविध विषय व अधिविभागांशी निगडीत या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2019
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामध्ये मोडी लिपी कार्यशाळा

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत मोडी लिपीं अभ्यास कार्यशाळा दि. २१ ते २८ फेब्रवारी या कालावधीत आयोजित केली आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही. तसेच या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरिताही ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. ही गरज लक्षात घेऊन ही अभ्यास कार्यशाळा मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी, समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

पुढारी

# विद्यापीठात २१ फेब्रुवारीपासून मोडी लिपी अभ्यास कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभागामार्फत मोडी लिपी अभ्यास कार्यशाळा दि.२१ ते २८ फेब्रुवारीपर्यंत होणार आहे. कार्यशाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी, कोल्हापूरच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप मार्गदर्शन करणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.